# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २६/०८/२०२५ ( मंगळवार )**

---

## नागपूर ग्रामीण जिल्हयातील गणेशोत्सव बंदोबस्ताकरीता नागपूर ग्रामीण पोलीस दलाच्या उपाययोजना आणि तयारी

दिनांक २७/०८/२०२५ ते ०६/०९/२०२५ या कालावधीत गणेशोत्सव साजरा केला जाणार असून दिनांक २७/०८/२०२५ रोजी सर्वत्र गणेश स्थापना होत आहे. दिनांक २७/०८/२०२५ रोजी गणेश स्थापनेकरीता सर्व २१ पोलीस स्टेशन अंतर्गत बंदोबस्ताचे नियोजन करण्यात आलेले आहे. सर्व ०६ उपविभागीय पोलीस अधिकारी व २१ पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांचे सोबत पोलीस स्टेशनचे अधिकारी व अंमलदार बंदोबस्ता करीता तैनात करण्यात आलेले आहे. या व्यतिरिक्त राज्य राखीव दलाचे ०१ प्लाटुन, नागपूर ग्रामीण दलाचे ०२ दंगा नियंत्रण पथक, ६५० होमगार्ड तसेच घटका बाहेरून प्राप्त पोलीस अधिकारी असे गणेश स्थापना बंदोबस्ताकरीता तैनात करण्यात आलेले आहेत. सर्व ०६ पोलीस उपविभागा मधील महत्वाच्या ठिकाणी एकुण १४ रूट मार्च घेण्यात आलेले आहेत. त्याच प्रमाणे कोणत्याही अप्रिय घटनेला सामोरे जाण्यासाठी एकुण १४ महत्वाचे ठिकाणी दंगा काबु योजनेचा सराव घेण्यात आला आहे.

संपुर्ण गणेशोत्सव शांततेत पार पडावा याकरीता अभिलेखावरील गुन्हेगार तसेच उत्सवाच्या काळात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करू शकेल अश्या गुन्हेगारांवर कलम १०७ जाफौ/ कलम १२६ भा.ना.सु.सं अन्वये ८२५ आरोपीतांवर , कलम ११० जाफौ/ कलम १२९ भा.ना. सु.सं अन्वये १३८ आरोपीतांवर , मदाका ९३ अन्वये २६७ आरोपीतांवर, मपोका १२२ अन्वये १२ आरोपीतांवर, मपोका १२४ अन्वये २४ आरोपीतांवर, मपोका ५५ ते ५७ अन्वये १४ आरोपीतांवर, एम.पी.डी.ए कायदयान्वये ६ आरोपीतांवर , MCOCA प्रमाणे १० आरोपीवर, प्रतिबंधक कारवाई करण्यात आली. सोबतच आणि कलम १४९ जाफौ / १६८ भा.ना.सु.सं एकुण ६०२ आरोपीतांना नोटीस बजाविण्यात आली. अशा एकुण **१८९८** गुन्हेगारांवर प्रतिबंधक कार्यवाही करण्यात आलेली आहे. तसेच अश्या गुन्हेगारांवर सतत लक्ष ठेवण्यात येत असून गणेशोत्सवाच्या काळामध्ये कायदयाचे उल्लंघन करणा—या व शांतता बिघडविण्याचा प्रयत्न करणा—या कोणत्याही समाज विघातक व्यक्ती विरूध्द कठोर कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल. तसेच नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांद्वारे सोशल मिडीयाचे सतत मॉनिटरींग केले जात

असुन सोशल मिडीयवर धार्मीक भावना दुखावणाऱ्या पोस्ट टाकुन जातीय तेढ निर्माण करणा—यांवर कठोर कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल. नागपूर ग्रामीण क्षेत्रामध्ये संपुर्ण गणेशोत्सव शांततेत पार पाडण्यासाठी नागपूर ग्रामीण पोलीस दलाने संपुर्ण तयारी पुर्ण केली असून गणेशोत्सवाच्या कालावधी मध्ये कोणतीही परिस्थिती हातळण्याकरीता नागपूर ग्रामीण पोलीस दल सज्ज आहे. सर्वनागरीकांनी उदया दिनांक २७/०८/२०२५ ते विसर्जना पर्यन्त संपुर्ण गणेशोत्सव शांततेत, आनंदात व नियमांचे पालन करून पार पाडावा असे आवाहन नागपूर ग्रामीण पोलीस दलातर्फे करण्यात येत आहे.

## आगामी येणाऱ्या सणोत्सवादरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याकरीता नागपुर ग्रामीण पोलीसांनी काढले रूट मार्च आणि राबविल्या दंगा काबु योजना

आगामी येणाऱ्या गणेशोत्सव आणि ईद—ए—मिलाद या सणोत्सवचा बंदोबस्त असल्याने नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांनी सणोत्सवादरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याकरीता दिनांक २६/०८/२०२५ रोजी खालीलप्रमाणे रूट मार्च घेवुन दंगाकाबु योजना राबविल्या. तसेच जनतेने सणोउत्सव आनंदाने, निर्भयतेने तसेच शांततेत साजरा करण्याबाबत आव्हान केले.

**कन्हान उपविभाग :—** श्री संतोष गायकवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी, कन्हान विभाग यांच्या मार्गदर्शनात खालील पोलीस स्टेशनला रूटमार्च घेतले.

**१) पोलीस स्टेशन कन्हान :—** श्री संतोष गायकवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी, कन्हान विभाग आणि पोलीस निरीक्षक श्रीमती वैजंयती मांडवधरे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन कन्हान यांचे उपस्थितीत कन्हान पोलीसांनी रूट मार्च काढला. नमुद रूट मार्च हा पोलीस स्टेशन कन्हान ते डाँ. बाबा साहेब आंबेडकर चौक ते तारसा चौक ते नाका नं. ७ ते तारसा चौक ते गहुहिवरा चौक डाँ. बाबा साहेब आंबेडकर चौक ते परत पोलीस स्टेशन कन्हान मार्गाने घेण्यात आला. रूट मार्च दरम्यान कन्हान येथील मुख्य चौक तारसा चौक येथे दंगा काबू योजनेबाबत सराव घेण्यात आला.

**१) पोलीस स्टेशन मौदा :—** श्री संतोष गायकवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी, कन्हान विभाग आणि पोलीस निरीक्षक श्री सारिन दुर्गे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन मौदा यांचे उपस्थितीत कन्हान पोलीसांनी रूट मार्च काढला. नमुद रूट मार्च हा पोलीस स्टेशन मौदा ते जयस्तंभ चौक ते ग्रामीण रूग्णालय मौदा  ते तिडके कॉलेज रोड चौक ते मौदा बस्टॉप ते तुकडोजी पुतळा, चक्रधर स्वामी गेट मार्गे शिवाजी चौकातुन पोलीस स्टेशन मौदा मार्गाने घेण्यात

आला. रूट मार्च दरम्यान  तुकडोजी पुतळा चौक येथे दंगा काबू योजनेबाबत सराव घेण्यात आला.

सदर रूट मार्च व दंगा काबू योजनेत स्थानिक पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदारसह ,पोलीस मुख्यालय, दंगा नियत्रंण पथक आणि गृहरक्षक असे उपस्थित होते.






TRANSPORT




**रामटेक उपविभाग :—** श्री रमेश बरकते, उपविभागीय पोलीस अधिकारी, रामटेक विभाग यांच्या उपस्थितीत खालील पोलीस स्टेशनला रूटमार्च काढण्यात आले.

**पोलीस स्टेशन रामटेक :—** श्री रमेश बरकते, उपविभागीय पोलीस अधिकारी, रामटेक विभाग ,पोलीस निरीक्षक श्री रविंद्र मानकर, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन रामटेक यांचे सह रामटेक पोलीसांनी रूट मार्च काढला. नमुद रूट मार्च हा पोलीस स्टेशन रामटेक ते शास्त्री चौक ते गांधी चौक ते किसान चौक ते आंबेडकर परत पोलीस स्टेशन रामटेक पर्यत या मार्गाने घेण्यात आला तसेच गांधी चौक येथे दंगा काबू योजनेचा सराव घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन अरोली :—** श्री रमेश बरकते, उपविभागीय पोलीस अधिकारी, रामटेक विभाग, आणि सहा. पोलीस निरीक्षक श्री स्हेनल राउत, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन अरोली यांच्यासह अरोली पोलीसांनी रूट मार्च काढला. नमुद रूट मार्च हा अरोली टाउन येथे घेण्यात आला. रूट मार्च नंतर बसस्टॅड चौक, अरोली दंगा काबू योजनेबाबत सराव घेण्यात आला.

सदर रूट मार्च व दंगा काबू योजनेत स्थानिक पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदारसह ,पोलीस मुख्यालय, दंगा नियत्रंण पथक आणि गृहरक्षक असे उपस्थित होते.


शांतता पथसंचलन


स्वातंत्र्य दिन
चिरायू होवो...
वैभव बॅनर फ्लेक्स




vivo
POLICE
डोंगरे क्लॉथ सेंटर
डोंगरे
क्लॉथ सेंटर
क्लॉथ स्टोअर्स

# अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद मौदा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक २५/०८/२०२५ रोजी मौदा पोलीस हे मथनी टोल नाका येथे कर्तव्यावर हजर असतांना मथनी टोल नाका येथे १२ चक्का टिप्पर क्रमांक **एम एच ४९ सी एफ ५१६४** थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. ट्रक चालक **आरोपी नामे विजय चैनसिंग पटले, वय २५ वर्ष, रा. पारडी भवानी नगर, नागपुर** याला रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. वाहन मालकाबाबत विचापुस केली असता आरोपी वाहन मालक नामे विनोद शेशराव भोयर, वय ४२ वर्षे, गुलमोहर नगर, कळमना रोड नागपुर असे असल्याचे सांगितले. पोलीसांनी पंचासमक्ष १) १२ चक्का टिप्पर क्रमांक एम एच ४९ सी एफ ५१६४ किमती २५,००,०००/रूपये आणि २) १० ब्रास रेती किंमती ५०,०००/— रूपये आणि असा एकुण २५,५०,०००/रूपयेचा माल केला आहे.

नमुद वाहन चालक आणि मालक आरोपीतांविरूध्द पोस्टे मौदा येथे **कलम ३०३(२),४९ भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदर गुन्हयाचा अधिक तपास मौदा पोलीस करीत आहेत.**




## पोलीस ठाणे कुही हद्दीतील मौजा चांपा गावातील अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढण्यासाठी मोहाफुल रसायन सडवा बाळगणाऱ्या आरोपीतांवर गुन्हे नोंद

**पोलीस स्टेशन कुही** :— कुही पोलीसांना गुप्त बातमीदाराकडुन खात्रीशीर माहीती प्राप्त झाली की, पाचगाव पोलीस चौकी अंतर्गत मौजा चांपा गावात, पारडी बेडयावर मोहाफुल सडवा वापरून मोहाफुल हातभट्टीची दारू काढल्या जात आहे. अशी माहीती प्राप्त होताच कुही पोलीसांनी पाच पथके नमुन एकाच वेळी पारधी बेडा येथे जावुन कारवाई केली. नमुद ठिकाणी जावुन रेड केली

असता **आरोपी नामे ज्ञानेश्वर लालचंद पवार, वय ३५ वर्षे, रा. पारडी बेडा ,कुही आणि महीला आरोपी हे** मोहाफुल रसायन सडवा बाळगुन मिळुन आला. सदर कारवाईमध्ये १) ४८०० लिटर मोहाफुल सडवा रसायन किंमती १,६८,०००/—रूपये आणि व २) ४८ ड्रम किंमती ९६०० /—रूपये असा एकुण १,७७,६००/— रूपयांचा मुद्देमाल मळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये २ गुन्हे नोंदविण्यात आले आहे.



## नागपुर ग्रामीण जिल्हयातील ६६३ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक १९/०८/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २१ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार

,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ६६३ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बोरी येथे ३१ आरोपी , ,पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३४ आरोपी अशा एकुण ९५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे २९ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २६ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे ३६ आणि पोलीस स्टेशन वेलतुर ३३ आरोपी अशा एकुण १२४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३४ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३१ आरोपी अशा एकुण १२३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ४० आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे ३५ आरोपी अशा एकुण ७५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३१ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २३ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे २४ आरोपी अशा एकुण ११० उरेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ४० आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३२ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ३५ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे २९ आरोपी अशा एकुण १३६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सर्व ६ उपविभागातील सर्व २१ पोलीस स्टेशन येथे एकुण ६६३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**


पोलीस स्टेशन,रामटेक



# रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार तपासले आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक २५/०८/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक २७/०८/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्री दिपक अग्रवाल, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपुर यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. पोलीस स्टेशन बोरी अंतर्गत वार्ड ४, बोरी, जुनी वस्ती, सातगाव, रिधोरा येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले आणि एम.आय.डी.सी. चौक येथे नाकाबंदी केली. पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी बोरी अंतर्गत गंगापुर झोपडपट्टी येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले आणि गार्डन चौक येथे नाकाबंदी केली. सदर कोबिंग ऑपरेशन श्री दिपक अग्रवाल यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. नाकाबंदी दरम्यान संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली. सदर कारवाईमध्ये स्थानिक पोलीस स्टेशन चे अधिकारी/अंमलदार  हजर होते.






मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने